जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-28

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वरुड | गुरुवार

०९.०४.२०२६

वर्ष: ०७ | अंक: ६८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## थोडक्यात

### गहिनीनाथ गडावर सीएम फडणवीसांनी सुरेश धसांचं नाव घेतलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बीड** – जिल्ह्याच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून एकमेकांचे कट्टर विरोधक मानले जाणारे नेते आज एकाच व्यासपीठावर एकत्र आल्याचे पाहायला मिळाले. निमित्त होते आष्टी तालुक्यातील म्हसोबाची वाडी येथे आयोजित श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या ९४ व्या नारळी सप्ताहाच्या सांगता समारंभाचे. या धार्मिक सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष उपस्थिती लावली. मात्र, या सोहळ्यात सर्वात जास्त चर्चा रंगली ती म्हणजे उपस्थित भाविकांनी धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्री करण्याची केलेल्या मागणीची.

# बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत वाढली रंगत

## शेवटच्या दिवशी ६ उमेदवारांची माघार: काँग्रेसचे आकाश मोरे मैदानात ठाम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस असून, या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. महायुती आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न सुरू असतानाच काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी निवडणूक लढवण्याचा निर्धार कायम ठेवला आहे. दरम्यान, या पोटनिवडणुकीत बुधवारी ६ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत.



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नुकताच दिल्ली दौरा केला असला तरी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांशी त्यांनी संपर्क साधला नसल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे. तसेच पार्थ पवार यांच्या काही वक्तव्यांमुळे काँग्रेस नाराज झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे काँग्रेसने उमेदवारी मागे न घेण्याची भूमिका घेतल्याचे समजते आणि सुनेत्रा पवार यांना प्रत्यक्ष निवडणुकीला सामोरे जावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आकाश मोरे यांनी स्पष्ट केले की, त्यांची उमेदवारी मल्लिकार्जुन खर्गे आणि राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली निश्चित झाली असून ते पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत.पक्षाने 'चला' म्हटले तर चालणार आणि 'थांबा' म्हटले तर थांबणार,असे सांगत त्यांनी अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठींचाच असेल, असे नमूद केले. बारामतीत विकासाचे मोठे दावे केले जात असले तरी प्रत्यक्षात सामान्य नागरिक अनेक समस्यांना सामोरे जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

बारामती पोटनिवडणुकीत आतापर्यंत विलास बाबुराव होळकर, माऊली जमादार कांबळे, रजाक ऊर्फ अब्दुलरोज जाफर मुलाणी, राहुल बाळासो थोरात, अमोल यशवंत कोकरे, अशोक रामचंद्र खामगळ या ६ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत.

४७ उमेदवार अद्याप रिंगणात बारामती पोटनिवडणुकीसाठी एकूण ५३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ६ जणांनी माघार घेतल्याने सध्या ४७ उमेदवार रिंगणात आहेत. आज अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने आणखी काही उमेदवार माघार घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बिनविरोध निवडणूक' आणि 'राजकीय संस्कृती'च्या मुद्द्यावरून भाजपवर निशाणा साधताना मोरे म्हणाले,सोयीचे शास्त्र आणि सवडीचा परमार्थ हेच भाजपचे धोरण असल्याचे दिसते.

# केंद्राकडून महिला आरक्षण सुधारणा मसुद्याला मंजुरी, विधेयक या महिन्यात मंजूर होण्याची शक्यता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नारी शक्ती वंदन कायद्यात सुधारणा करणाऱ्या विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावानुसार लोकसभेच्या जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरून ८१६ पर्यंत वाढेल, ज्यापैकी २७३ जागा महिलांसाठी राखीव असतील. सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशन वाढवले असून १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे, जिथे हे सुधारणा विधेयक मंजूर होण्याची शक्यता आहे. संसदीय मंजुरी मिळाल्यानंतर, हा कायदा ३१ मार्च २०२९ रोजी लागू होईल. तो प्रथम त्या वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुका आणि काही राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमध्ये प्रभावी होईल. प्रस्तावानुसार, आरक्षण उभ्या तत्त्वावर लागू केले जाईल, म्हणजेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या जागांमध्येही महिलांचा वाटा निश्चित केला जाईल.

### २७३ जागा महिलांसाठी राखीव




सरकार स्वतंत्र विधेयक सादर करणार राज्य विधानसभेतील जागाही त्याच प्रमाणात राखीव ठेवल्या जातील. सरकार मतदारसंघांची विभागणी नव्याने निश्चित करण्यासाठी सीमांकन कायद्यात सुधारणा करण्याकरिता एक घटनादुरुस्ती विधेयक तसेच एक स्वतंत्र सामान्य विधेयक सादर करणार आहे. २०२७ च्या जनगणनेऐवजी २०११ च्या जनगणनेच्या आधारावर नवीन जागा निश्चित केल्या जाऊ शकतात. हा कायदा राज्य विधानसभा आणि दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, आणि पुदुचेरी यांसारख्या केंद्रशासित प्रदेशांमध्येही लागू केला जाईल.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१४७७८६ रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने -१३६३७२ रु.(१०ग्रॅम)

चांदी - २,६५,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

# विज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांचा जीव टांगणीला

## डीपी उघडी, बॉक्सचा दरवाजा तुटलेला, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, नागरिक संतप्त

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – राजुरा बाजार रस्त्यावरील मौजा पिंपळखुटा परिसरात वीज वितरण व्यवस्थेतील निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. डीपी जवळ कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसून पॉवर बॉक्सचा दरवाजा तुटलेला असल्यामुळे तो सतत उघडाच राहतो. त्यामुळे कोणत्याही नागरिकाचा, विशेषतः शेतकऱ्यांचा विजेच्या धक्क्याने



जीव धोक्यात येण्याची भिती व्यक्त केली जात आहे. परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या अडचणीत सापडला आहे. शेतीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याच्या मोटारी चालविण्यास अडथळा येत असून पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे. परिणामी पिकांचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

वेळेवर वीजपुरवठा न मिळाल्यामुळे शेतीचे नियोजन बिघडत असून आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे वीज वितरण विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन नियमित व सुरळीत वीजपुरवठा करावा, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे. याशिवाय परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक वेळा तक्रारी करुनही संबंधित विभागाकडून तत्काळ दखल घेतली जात नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. तक्रार दिल्यानंतरही एक ते दोन दिवस कोणतीही कारवाई होत नसल्यामुळे संताप व्यक्त होत आहे. तसेच वीज वाहिन्यांच्या आजूबाजूला झाडे मोठ्या प्रमाणात वाढलेली असून त्यामुळेही धोका वाढला आहे. संबंधित विभागाकडून कोणतीही उपाययोजना न झाल्यामुळे माजी जि.प.सदस्य गोपाल मालपे यांनी स्वतः खर्च करुन झाडांची छाटणी केल्याची माहिती मिळाली आहे. सदर ठिकाणी कायमस्वरुपी उपाय म्हणुन केबल टाकण्याची मागणी नागरिकांकडून होत असून वीज वितरण कंपनीने तातडीने लक्ष देऊन आवश्यक दुरुस्ती व देखभाल करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.



“परिसरातील वीज व्यवस्थेची अवस्था अत्यंत गंभीर असून संबंधित विभागाचा पूर्णपणे निष्काळजीपणा दिसून येत आहे. डीपी उघडी ठेवणे व पॉवर बॉक्सचा दरवाजा तुटलेला असणे ही अत्यंत धोकादायक बाब आहे. यामुळे कोणत्याही वेळी मोठी दुर्घटना घडू शकते.

तसेच वारंवार वीज खंडित होणे व तक्रारी करुनही वेळेत दखल न घेणे हे शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरत आहे. वीज वाहिन्यांजवळ वाढलेल्या झाडांकडेही दुर्लक्ष करण्यात येत असल्याने धोका अधिक वाढत आहे.

याबाबत वीज वितरण कंपनीने तात्काळ उपाययोजना करून डीपी सुरक्षित करावी, पॉवर बॉक्सची दुरुस्ती करावी तसेच परिसरात केबल टाकण्याचा विचार करावा, अशी मागणी माजी जि.प.सदस्य गोपाल मालपे यांनी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या सुरक्षेसाठी आंदोलनाचा ईशाराही त्यांनी दिला आहे.

# गुजराती जनता 'अशिक्षित' असल्याचे वक्तव्य

## खर्गेनी व्यक्त केला खेद : गुजरातबद्दल सर्वोच्च आदर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली :** – काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी गुजरातच्या जनतेला 'अशिक्षित' म्हटल्याबद्दल बुधवारी अधिकृतपणे खेद व्यक्त केला आहे.



गुजरातच्या जनतेबद्दल आपल्या मनात नेहमीच सर्वोच्च आदर होता आणि भविष्यातही राहील, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. केरळमधील विधानसभा निवडणुकीच्या पंतप्रधान मोदी आणि विजयन हे गुजरातसारख्या ठिकाणच्या अशिक्षित लोकांना मूर्ख बनवू शकतात, पण केरळमधील सुशिक्षित जनतेला नाही. या वक्तव्यानंतर राजकीय वतुर्ळात मोठा गदारोळ निर्माण झाला होता. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केरळमधील एका निवडणूक सभेत केलेल्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. दरम्यान या प्रकरणी बुधवारी दिल्लीतील काँग्रेस कार्यालयाबाहेरही गुजराती बांधवांनी जोरदार निदर्शने केली. भाजपचा पलटवार खर्गे यांच्या या विधानावरून भारतीय जनता पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला होता. माजी केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांनी पत्रकार परिषदेत काँग्रेसवर हल्लाबोल करत, 'राहुल गांधी, सोनिया गांधी आणि प्रियांका गांधी खर्गे यांच्या या विधानाशी सहमत आहेत का, असा सवाल विचारून स्पष्टीकरणाची मागणी केली होती.



# मरसाजोग सरपंचपदाच्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – मस्साजोग सरपंच पदाची निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी एकीकडे प्रयत्न केले जात असतानाच आता या निवडणुकीच्या रिंगणात संतोष देशमुख यांच्याकडून पराभूत झालेले स्वरूपानंद देशमुख यांची एन्ट्री झाली आहे. मला सरपंच पदाचे उमेदवार केलंय, असेच ही निवडणूक बिनविरोध होईल, असे ते म्हणाले आहेत. स्वरूपानंद देशमुख हे आज (९ एप्रिल) दुपारी १ ते ३ या वेळेमध्ये आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. मला सगळं गाव म्हणत असेल बिनविरोध करा, तर ठीक आहे. पण तुम्हाला २९ तारखेला सगळं कळेल. गावात २२८४ मतदान आहे. देशमुख कुटुंबाच्या न्यायाच्या लढाईत आम्ही सोबत आहोत. मी पण गावचा माणूस आहे. मलाही बिनविरोध निवडून दिले पाहिजे असेही स्वरूपानंद देशमुख म्हणाले.

## नाशिकमधील बड्या कंपनीत बळजबरी धर्मांतर



# राजर्षी छत्रपती शाहु महाराज परदेश शिष्यवृती योजनेंतर्गत अर्ज करण्यास १५ मेपर्यंत मुदतवाढ

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांना परदेशामध्ये विशेष अध्ययन, उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहु महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या सुवर्ण संधीचा विभागातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील मुला-मुलींना परदेशामध्ये विशेष अध्ययन करण्यासाठी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पी.एच.डी.साठी विविध अभ्यासक्रमांच्या उच्च शिक्षणासाठी राजर्षी छत्रपती शाहु महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत सन २०२६-२७ साठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यासाठी शासनाने मंजुरी दिलेली असून याबाबत शासनाच्या www.maha-rashtra.gov.in या संकेतस्थळावर ताज्या घडामोडींमध्ये विस्तृत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. १५ मे २०२६ पर्यंत देण्यात आलेली आहे.

# अंजनगावसुर्जीच्या महिला होणार आत्मनिर्भर : जिल्हाधिकाऱ्यांनी साधला प्रशिक्षणार्थ्यांशी थेट संवाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**अमरावती** – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती मार्फत आणि जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या किमान कौशल्य विकास कार्यक्रम (२०२५-२६)अंतर्गत सुरू असलेल्या 'फॅशन डिझायनर' या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण बॅचला आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी भेट दिली.

अंजनगाव सुर्जी येथील रोशनी महिला विकास संस्थेद्वारे संचलित या प्रशिक्षणार्थीसोबत त्यांनी थेट संवाद साधला आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रशिक्षणातून स्वावलंबी होण्याचा मार्ग प्राप्त होतो असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केलेत.

या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले की, 'या योजनेचा उद्देश केवळ प्रशिक्षण पूर्ण करणे हा उद्देश नसून, प्राप्त कौशल्याचा वापर करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे महत्त्वाचे आहे. रोशनी रेडीमेड गारमेंट फाउंडेशन, एमआयडीसी, अंजनगाव सुर्जी येथे कार्यान्वित करण्यात आलेल्या फेब्रिक क्लस्टरमध्ये प्रशिक्षणार्थ्यांनी रोजगाराच्या संधी मिळवाव्यात आणि स्वतःच्या पायावर उभे होवून सक्षम व्हावे, असा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

महिलांनी केवळ वस्तूंची निर्मिती करून न थांबता, त्यांच्या मार्केटिंगवर विशेष लक्ष केंद्रित करावे. व्यवसायाचे विस्तारीकरण करण्यासाठी बाजारपेठेची मागणी ओळखून नाविन्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थींनी केवळ प्रशिक्षणापुरते मर्यादित न राहता, उद्योग उभारणीसाठी पुढाकार घ्यावा. विविध शासकीय योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीचा आणि सवलतीच्या कर्ज योजनांचा लाभ घेऊन स्वतःचे छोटे-मोठे उद्योग सुरू करावेत व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले.

या विशेष प्रशिक्षण उपक्रमात अल्पसंख्यांक समाजातील महिलांनी नोंदवलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी समाधान व्यक्त केले. समाजातील सर्व स्तरांतील महिला मुख्य प्रवाहात येत असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

हा प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पूर्णतः मोफत राबविला जात आहे. जिल्हा उद्योग केंद्र,अमरावती यांचे निधीतून उभे राहिलेल्या स्थानिक एमआयडी सीमधील फेब्रिक क्लस्टरमध्ये किमान कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना रोजगारासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे.

फॅशन डिझायनिंग सारख्या रोजगाराभिमुख कोर्सेसमुळे ग्रामीण भागातील महिलांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. जिल्हा प्रशासना मार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे अंजनगाव सुर्जी परिसरातील गरजू तरुणांना आणि महिलांना स्थानिक पातळीवरच रोजगाराच्या दर्जेदार संधी उपलब्ध होणार आहेत.

या प्रसंगी जिल्हा कौशल्य विकास विभागाच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे, तहसीलदार पुष्पा दाबेराव, संस्थेच्या संचालिका शोभा सुने, आशिष सुने, केंद्रातील प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी आदी उपस्थित होते.

# भारतीय डाक विभागात विमा एजंट पदासाठी २१ एप्रिलला मुलाखती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – भारतीय डाक विभागाकडून डाक जीवन विमा योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यासाठी विमा एजंट नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी उमेदवाराचे वय मुलाखतीच्या दिवशी १८ वर्षांपेक्षा कमी नसावे तसेच उमेदवार किमान इयत्ता दहावी किंवा बोर्डाची समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उमेदवारांची निवड ही त्यांचे व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्व, संवाद कौशल्य, जीवन विम्याबाबतचे ज्ञान आणि मुलाखतीत मिळणाऱ्या गुणांच्या आधारावर केली जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारास ५ हजार रुपयांची अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून एनएससी किंवा केव्हीपीच्या स्वरूपात ठेवावी लागेल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर डाक विभागाकडून सुरुवातीला तात्पुरता परवाना देण्यात येईल. हा परवाना आयआरडीए ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कायमस्वरूपी परवान्यात रूपांतरित केला जाईल. ही नियुक्ती पूर्णपणे कमिशन तत्त्वावर असेल. भारतीय डाक विभागाने कोणतीही पूर्वसूचना न देता निवड रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. इच्छुक उमेदवारांनी १० वी उत्तीर्ण प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड आणि पासपोर्ट साईज फोटोसह दि.२१ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत 'प्रवर अधीक्षक कार्यालय, कॅम्प, अमरावती – ४४४६०२' येथे उपस्थित राहावे, असे आवाहन अमरावती विभागाचे प्रवर अधीक्षक डाकघर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# गणेश धोटे यांचे निधन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – येथील जिजाऊ नगर परिसरातील रहिवाशी गणेश मधुकरराव धोटे यांचे वयाच्या ४९ व्या अल्पशा आजाराने निधन झाले. गेल्या २ दिवसांपुर्वी त्यांच्या प्रकृतीमध्ये अचानक बिघाड झाल्यामुळे त्यांना नागपुर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते परंतु काल सायंकाळच्या सुमारास अचानक उपचारादरम्यान त्यांची प्रकृती खालावली व त्यातच त्यांचा मृत्यू झाला. आज सकाळच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर न.प.स्मशान भूमीत आप्तेष्ट, स्वकीय, नातेवाईक आणि शहरवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे आई, वडिल, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, बहिण, जावई असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या अचानक निधनाने जिजाऊ नगर परिसरातील शोक व्यक्त केल्या जात आहे.

# अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्यास 30 जूनपर्यंत मुदत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी प्रणालीवर विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे नवीन अर्ज व नूतनीकरणाचे अर्ज भरण्यासाठी, तसेच २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षांतील अर्जांची त्रुटीपूर्तता करण्यासाठी आता ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या विभागामार्फत प्रामुख्याने भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, मॅट्रिकोत्तर शिक्षण व परीक्षा फी प्रतिपूर्ती, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन आणि व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अशा पाच महत्त्वाच्या योजना राबवल्या जातात. माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत महाडीबीटी पोर्टल कार्यान्वित करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत आपले अर्ज ऑनलाइन सादर करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या लॉगिनला त्रुटीपूर्ततेसाठी 'डशपव इरलज्ञ' केलेले अर्ज संबंधित महाविद्यालयांनी तातडीने विद्यार्थ्यांकडून दुरुस्त करून घ्यावेत. विहित वेळेत अर्ज भरून घेण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांची राहणार आहे. अमरावती जिल्ह्यातील पात्र विद्यार्थी आणि महाविद्यालयांनी नवीन अर्ज भरण्याची व प्रलंबित अर्जांची त्रुटीपूर्तता करण्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे.

# नवकार महामंत्रामध्ये विश्व कल्याणाची शक्ती : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## विश्व नवकार महामंत्र दिवस कार्यक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**मुंबई** – सर्व जगामध्ये नवकार महामंत्राचा आजच्या पवित्र दिवशी सामूहिक जप होत आहे. आपली संस्कृती ही विश्वबंधुत्वाची आणि शांती प्रस्थापित करणारी आहे. आपल्या संस्कृतीला नवकार महामंत्र निश्चितच सर्वव्यापी करतो. नवकार महामंत्रामध्ये विश्व कल्याणची शक्ती असून विश्वशांतीसाठी या महामंत्राच्या जपाचा निश्चितच सकारात्मक परिणाम होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन यांच्यावतीने विश्व नवकार महामंत्र दिवस कार्यक्रमाचे आयोजन वरळी येथील एनएससीआय डोम मध्ये करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर आचार्य परम सागर महाराज, निरंजन सागर महाराज, सौम्य सागर महाराज, मानव कोठारी, भगवत कोठारी,आशिष शहा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या जगामध्ये सर्व सजीव प्राणी ही सृष्टीचे मुले आहेत. सर्वांना जीवन जगण्याचा अधिकार आहे. 'जिओ और जीने दो' हे आपले तत्व जैन विचारांमधून प्रतिपादित होते. विश्व कल्याणसाठी यापेक्षा दुसरा विचार असूच शकत नाही. नवकार मंत्र हा अशा विचारांना पुढे नेण्यास मदत करतो. नवकार मंत्राच्या जपातून पाप शुद्धी होऊन सकारात्मक कार्य करण्याची ऊर्जा मिळते. या महामंत्राच्या सामूहिक जपाने संपूर्ण विश्वाच्या शांतीसाठी एक महायज्ञ सुरू आहे. या मंत्रामुळे नवजीवन आपल्याला प्राप्त होते.

नवकार मंत्राच्या माध्यमातून पाच तत्वांना आपण नमस्कार करतो. सर्व जगाला यातून आपण नमस्कार करीत असतो. मंत्राच्या जपाने अरिहंत परिस्थिती निर्माण होते. तीर्थंकरांची अवस्था ही अरिहंताची आहे. या मंत्राच्या जपाने जगामध्ये असलेल्या सर्व सकारात्मक शक्ती आपल्याशी जोडल्या जातात. हा मंत्र केवळ व्यक्तीच्या विचारांनाच शांती देत नाही, तर 'इनर सेल्फ' लासुद्धा शांती देतो. विश्वशांतीचा विचार देणाऱ्या, आनंद देणारा , सकारात्मक शक्तींना जोडणाऱ्या या मंत्राचा जप विश्व कल्याणासाठी फलदायी आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केले.

जैन समाज प्रत्येक जीव, जंतू, प्राणी यांचा विचार करणारा असून भूतदया आणि प्राणी सेवा ही समजात केली जाते. प्राणीसेवेचा विचार केवळ शब्दांमध्ये न ठेवता प्रत्यक्ष वास्तविकतेत जैन समाजामध्ये आणला जातो, असे गौरवोद्गार ही मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले. कार्यक्रमाला जैन समाजातील आचार्य, मुनी, उपाध्यय, साध्वी व जैन समाज बांधव उपस्थित होते.

# संपादकीय

चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.

## कागदावरील समानतेकडून प्रत्यक्ष आचरणाकडे : महिला आरक्षणाचे नवे पर्व

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात काही क्षण हे सुवर्णक्षरांनी कोरले जातात. जेव्हा एखादा निर्णय केवळ राजकीय फायद्यासाठी नसून, तो थेट देशाच्या सामाजिक संरचनेत बदल घडवणारा असतो, तेव्हा तो निर्णय खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरतो. 'महिला आरक्षण' ही केवळ संसदेतील जागांची निश्चिती नाही, तर ती भारतीय राज्यघटनेच्या त्या मूळ भावनेची पूर्ती आहे, जिथे लिंगाधारित भेदभाव संपवून 'समानता' हा केवळ शब्द न राहता तो एक जगण्याचा अनुभव बनावा, अशी अपेक्षा व्यक्त केली गेली होती. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की, 'मी एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप त्या समाजातील महिलांनी केलेल्या प्रगतीवरून करतो.' आज जेव्हा आपण महिला आरक्षणाच्या सुनिश्चितीबद्दल बोलतो, तेव्हा आपण प्रत्यक्षात आंबेडकरी विचारांच्या आणि घटनात्मक मूल्यांच्या अधिक जवळ जात असतो. संविधानिक चौकट आणि समानतेचे तत्त्व आपल्या राज्यघटनेच्या कलम १४, १५ आणि १६ मध्ये समानतेचा अधिकार स्पष्टपणे नमूद केला आहे. कलम १५(३) मध्ये राज्याला महिला आणि मुलांसाठी विशेष तरतुदी करण्याचे अधिकार दिले आहेत. मात्र, स्वातंत्र्यानंतर सात दशके उलटूनही, धोरणकर्त्यांच्या सर्वोच्च सभागृहात महिलांचे प्रतिनिधित्व अत्यंत नगण्य राहिले. समानता ही केवळ पुस्तकात किंवा भाषणात राहून चालत नाही; ती जेव्हा व्यवहारात येते, तेव्हाच लोकशाही प्रगल्भ होते.

महिला आरक्षणाची ही नवीन संधी राज्यघटनेच्या 'प्रास्ताविके'तील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाच्या आश्वासनाला बळकटी देणारी आहे. जोपर्यंत अर्धी लोकसंख्या निर्णय प्रक्रियेपासून दूर असते, तोपर्यंत तो 'न्याय' अपूर्णच असतो. आरक्षणापलीकडचा दृष्टिकोन: सामाजिक आचरण लेखकाच्या किंवा विचारवंतांच्या मते, कायदा हा केवळ मार्ग दाखवू शकतो, पण चालायचे काम समाजाला करावे लागते. आजवर आपण पाहिले की, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (ग्रामपंचायत, नगरपालिका) महिलांना आरक्षण मिळाले. तिथे सुरुवातीला 'सरपंच पती' ही संकल्पना उदयाला आली. हा समाजाच्या मानसिकतेचा दोष होता. कागदावर महिला सरपंच होती, पण अधिकार पुरुष वापरत होते. मात्र, काळाच्या ओघात हे चित्र बदलले. महिलांनी स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यास सुरुवात केली. संसदेतील ३३ टक्के आरक्षण हे आता या सामाजिक बदलाला राष्ट्रीय स्तरावर नेणार आहे. जेव्हा एखादी महिला संसदेत उभी राहून संरक्षण, अर्थकारण किंवा परराष्ट्र धोरणावर बोलते, तेव्हा ती केवळ एक व्यक्ती नसते, तर ती देशातील करोडो मुलींची प्रेरणा असते. समाजाच्या आचरणात बदल तेव्हाच होतो, जेव्हा वर्चस्वाच्या जागांवर विविधतेचा शिरकाव होतो. राजकीय प्रतिनिधित्व आणि धोरणात्मक बदल महिलांचे राजकारणातील वाढते प्रमाण हे केवळ 'जागा भरणे' नाही, तर ते 'दृष्टिकोन बदलणे' आहे. संशोधने असे सांगतात की, जिथे महिला लोकप्रतिनिधी आहेत, तिथे आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि बालसंगोपन या विषयांवर अधिक प्रभावी काम झाले आहे. महिलांची निर्णयक्षमता ही अधिक सर्वसमावेशक आणि संयमी असते. राज्यघटनेच्या भावनेशी हे अशा प्रकारे जोडलेले आहे की, राज्यघटनेला 'कल्याणकारी राज्य' अपेक्षित आहे. महिलांचे प्रश्न्ङ्कमग ते सुरक्षिततेचे असोत की कौटुंबिक हिंसेचे, रोजगाराचे असोत की आरोग्याचेङ्कहे प्रश्न जेव्हा त्या स्वतः मांडतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने कायदे अधिक संवेदनशील बनतील. समानतेचे व्यावहारिक अनुभव केवळ संसदेत आरक्षण देऊन समानता येणार नाही. ती घराघरात पोहोचायला हवी. जो समाज आपल्या घरातील मुलीला शिकवतो, पण तिला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देत नाही, त्या समाजात राज्यघटनेची भावना अजून पोहोचलेली नाही असेच म्हणावे लागेल. आरक्षणामुळे महिलांना जी राजकीय ताकद मिळेल, तिचे रूपांतर सामाजिक ताकदीत होणे आवश्यक आहे. जेव्हा एखादी स्त्री राजकारणात सक्रिय होते, तेव्हा समाज तिच्या चारित्र्यावर, तिच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतो. ही मानसिकता बदलणे म्हणजे 'राज्यघटनेचे आचरण' करणे होय. समानता ही रडतखडत स्वीकारण्याची गोष्ट नसून ती आनंदाने स्वीकारलेली जीवनशैली असायला हवी. संधी, आव्हाने आणि भविष्याची वाटचालमहिला आरक्षण विधेयक मंजूर होणे ही एक सुरुवात आहे. खरी लढाई ही अंमलबजावणीच्या स्तरावर आहे. मतदारसंघ पुनर्रचना आणि जनगणनेच्या अटींमुळे याला थोडा विलंब लागू शकतो, परंतु ही दिशा आता निश्चित झाली आहे. राजकीय पक्षांनी केवळ आरक्षणाची वाट न पाहता, आपल्या संघटनात्मक बांधणीतही महिलांना मोक्याच्या जागा द्यायला हव्या आहेत.

# देशाचा सैनिक ते गावाचा कुंटूबप्रमूख सरपंच सुधाकर मानकर



गाव विश्वाचा नकाशा!गावावरुनी देशाची परिक्षा!गावची भगंत: अवदशा! येइल देश ग्रामगीता असा प्रकारचा दिव्य संदेश वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी दिला आहे. आपल्या गावाला बदल घडवून आणण्याची किमया एका सेवा निवृत्त भारतीय सैनिकाने करुन दाखवली आहे.तसा तो माणूस अतिशय श्रमिक, सर्व सामान्य कुटुंबातील, भारतीय सेनेत प्रविष्ट झाल्यावर पायाने व्यंग झालेला परंतु अफाट शक्ती, गावाविषयी जिव्हाळा आणि जिद्द, चिकाटी, प्रेम यामुळे ते सिद्ध करुन दाखवले.त्या गाव कुंटूबवत्सल प्रमूखाचे नाव आहे सुधाकर महादेव मानकर, अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यात जरूड येथील अतिशय नावाजलेल्या व शैक्षणिक दृष्ट्या प्रगत झालेल्या श्रीमंत आणि श्रमिक गावात ५ मे १९६२ रोजी श्रीमती वत्सलाबाई महादेव मानकर यांच्या कुळात जन्म झाला. हे सहा बंधू व एक बहिण असे एकूण नऊ जणांचे कुटुंब पूढे सर्वांचे विवाह झाले.आणि कुंटूबाचा विस्तार वाढत गेला. त्या सर्व बंधू-भगिनीनां कामाला लावण्यापासून त्यांचे घर संसार सुखाचा करून त्यांना कामी लावण्या पर्यंत सर्व कुटुंबाची जबाबदारी संपूर्णपणे सांभाळली हे सर्व करीत असतांनाच अगदी तरुण वयातच .इ.स.१९८२ते२००३असे एकूण बावीस वर्षे आपल्या भारत देशाच्या मायभूमीची सेवा केली.सैनिकाची नौकरी करीत असतानांच अनेक खाचखळगे अनुभवले.अशातच इ.स.१९९१मध्ये नांदोरा लष्करपूर येथील श्री महादेव पाचपोहर यांच्या कन्येशी सौ.रेखा हिच्याशी विवाहबद्ध झाले पूढे चिरंजीव अमित यांनी कौटुंबिक जबाबदारी स्वीकारली. आणि मुलगी डॉ.अर्पणा वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असतांनाच संपूर्ण मुलाबाळांची जबाबदारी घरच्या लोकांनी सांभाळत असतांनाच'गावचे जे पवित्र सेवक तेचि प्रसंगी होती सैनिक ज्या गावी ऐसै सावध पाईक! तेथे विघ्न न ठाके या ग्रामगीतेतील वचनाप्रमाणे गेली बावीस वर्षांच्या देश सेवेनंतर फक्त स्वतःचे वैयक्तिक घरचे, कुंटूबाचे काम न करता? ग्राम आपले गाव हेच ग्राम कुंटूब समजून सन २००३पासून गावाचे पालकत्व स्वीकारले.'गाव करी ते राव न करी!है सांगूनि ठेविले चतुरी जरी दाद न घेतील अधिकारी!तरी गाव त्या सुधारु शके!त्या दिवसापासून ते कामाला लागले, आज ते २०१४ पासून तर २०१९पर्यंत तंटामुक्ती चे सर्वप्रथम सदस्य आणि नंतर अध्यक्ष म्हणून काम पाहिले. सन २०१९ला गावांच्या जनता जनार्दनाने एक मताने सरपंच पदि नेमणूक केल्यावर 'जरूड गाव हिरवेगार गाव हे काम हाती रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड केली, लाखोंच्या संख्येने वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावली, जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये जाऊन तसेच निमसरकारी शाळा, महाविद्यालय परिसरात आजच्या भाविपिढीला चांगले शिक्षण मिळावे यासाठी पाठपुरावा केला. आमच्या गावातील तरूण युवक, सशक्त, सुबध्द व्हायला हवा यासाठी खुले अत्याधुनिक व्यायाम शाळा, क्रिडा साहित्य निर्माण केले. आज सकाळी सायंकाळी तिथे तरूण युवक व्यायाम करतात, नाल्यांची व रस्त्यांची दुरुस्ती केली.ऐवढयावर न थांबता .'वृक्ष सर्वांची सेवा करतो!छाया फळे फुले देतो! शेवटी प्राण तोही अर्पितो सेवेसाठी गावाला हिरवेगार करण्यासाठी स्वतःची वृक्ष रोपवाटिका तयार करुन त्यामध्ये शेकडो हातांना काम दिले. आणि लाखोंच्या संख्येने वृक्षारोपण वृक्षसंवर्धन केल्याने महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या वतीने साडेतीन कोटींच्या रक्कमेची बक्षिसे गावांसाठी मिळवून त्यातून ग्रामविकासाची कामे केली.जसे आपले जन्म घेण्याचे व राहण्याचे घर निवास स्थान सुंदर असावे तसेच शेवटच्या काळात मुत्यूस्थळ सुध्दा गावोगावी सुंदर असले पाहिजे त्याकरीता आदर्श मशानभूमी निर्माण करून तिथे कर्मयोगी संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमा बसवून भगवान शंकराच्या साक्षीने प्रत्येक समाजातील लोकांचा अंत्यसंस्कार ग्रामगीते प्रमाणे संपन्न होतो.त्यांच्या या कामांची दखल शासनाने घेतली आणि जरुड चे नाव फक्त पंचक्रोशीत नाही तर शासन दरबारी गाजायला लागले. अशा प्रकारचें सेवा कार्य आपल्या गावांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायतच्या माध्यमातून सरपंच आणि गावकऱ्यांनी एकत्र येऊन सामुदायिक रित्या चालविले तर निश्चितपणे ही दखल घेतली जाईल. खरोखरच ही वार्ता व कृषी विकास अधिकारी प्रकाश तट्टे यांनी ही वार्ता रोजगार संघाचे व आद्यग्रामगीताचार्य रामकृष्ण बेलूरकर विचार प्रतिष्ठान, नागपूरचे कार्याध्यक्ष उद्धव साबळे यांच्या पर्यंत पोहोचली आणि त्यांच्या कार्याला गती मिळाली. रोजगार संघाचे अध्यक्ष संजय नाथे यांनी त्यांना वृक्षसखा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्याच सोबत वनराईचे सर्वेसर्वा डॉ.गिरीश गांधी यांच्या वतीने त्यांना पुरस्कृत करण्यात आले. त्याच सोबत पहिल्या ग्राम निर्माण संमेलनाचे निमित्ताने आद्यग्रामगीताचार्य रामकृष्णदादा बेलूरकर विचार प्रतिष्ठान, नागपूर व श्री गुरुदेव सेवा मंडळ, श्रीक्षेत्र वरखेड यांच्या वतीने डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.शरद निंबाळकर, डॉ.बाळ पदवाड यांच्या शुभहस्ते पुरस्कार देण्यात आला. हनुमान जयंतीच्या निमित्ताने संपूर्ण ग्रामजयंती महापर्व दिनांक १ ते ३० एप्रिल २०२६पर्यत राबविण्यात येत असून आपल्या गावाला सुंदर हिरवेगार करण्यासाठी सतत धडपड करणाऱ्या आणि आजच्या विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये आपल्या कुटुंबियांना सदैव सोबत घेऊन त्यांच्या जीवनात प्रकाश फुलविणाऱ्या आणि एकत्र कुटुंब पद्धती टिकवून ठेवण्यासाठी अविरतपणे झटणाऱ्या आदर्शवत कुंटूबवत्सल प्रमूख सुधाकर महादेव मानकर यांना 'अन्नपुर्णा फौडैशन, नागपूरचे वतीने उध्दव लक्ष्मण साबळे, डॉ.रेवती महेश साबळे, डॉ.भारती उध्दव साबळे यांनी कुंटूबवत्सल प्रमूख म्हणुन निवड केली त्यांचा नुकताच डॉ.बाबासाहेब साबळे आणि चिन्मय वसंत फुटाणे यांच्या हस्ते गेल्या ५ एप्रिल २०२६ ला सुरळी गावात पुरस्कृत केले त्याबद्दल कोटी कोटी शुभेच्छा! म्हणोनी आमुची बुद्धी विशाल करी! कर्म करावया भुलोकावरी! आयुष्य दे शतकं निर्धारी! जीवो आम्ही विश्वसेवे-ग्रामगीता



माणिकदास बेलूरकर
संत साहित्य अभ्यासक श्रीक्षेत्र वरखेड तालुका तिवसा जिल्हा अमरावती मो.९४२००७६५७३

# 'विश्वगुरू' भारताचे विदेश नीतीमध्ये फसलेले पाऊल

भारत सध्या बघत आहे आणि जग भारताकडे बघत आहे आणि जे दिसतं ते 'विश्वगुरू'चे चित्र नाही. भारताची विदेश नीती ही पूर्णपणे अपयशी ठरतेय आणि एस. जयशंकर यांच्या लीला भारताची प्रतिमा मलीन करतायत.



दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्रीच्या अंधारात अमेरिका आणि इस्रायलने एकत्रितपणे इराणवर हवाई हल्ले केले. मध्यपूर्वेत आग लागली. होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाली. तेलाचे भाव गगनाला भिडले. या महाभयंकर संकटाच्या वेळी जगाने एक अत्यंत धक्कादायक, लाजिरवाणे दृश्य पाहिले पाकिस्तान मध्यस्थीचे नेतृत्व करत होता, इस्लामाबादमध्ये जगातील मोठ्या देशांचे परराष्ट्र मंत्री जमत होते आणि 'विश्वगुरू' भारत मूग गिळून बघत होता. हे एका रात्रीत घडले नाही. हे वर्षानुवर्षांच्या चुकीच्या परराष्ट्र धोरणाचे, व्यक्तिकेंद्रित मुत्सद्देगिरीचे, धोरणात्मक अंधत्वाचे आणि देशांतर्गत राजकारणासाठी राष्ट्रहिताचा बळी देण्याचे फळ आहे.

भारतीय विदेश नीतीच्या इतिहासातील सर्वात वाईट टायमिंग जर कोणते ठरले असेल तर इराणवर हल्ला होण्याच्या अवघ्या दोन दिवस आधी पंतप्रधान नरेंद्र मोदी इस्रायलला गेले. तिथे त्यांनी नेतान्याहूंसोबत 'विशेष धोरणात्मक भागीदारी' करार केला. फोटो काढले. परत आले. दोन दिवसांनंतर युद्ध सुरू झाले. याचा अर्थ भारताच्या गुप्तचर यंत्रणेला, रॉ ला, परराष्ट्र मंत्रालयाला खरोखरच या हल्ल्याची काहीच कल्पना नव्हती का? जर खरोखरच माहीत नव्हती, तर आपल्या गुप्तचर आणि विदेश नीती यंत्रणेची कठोर चौकशी व्हायला हवी. जर माहीत होते, तर मोदींनी नेतान्याहूंच्या राजकीय फायद्यासाठी भारताच्या राष्ट्रहिताचा बळी दिला, असा अर्थ होतो.

नेतान्याहूंचे राजकीय अस्तित्व दोन गोष्टींवर अवलंबून होते. युद्ध सुरू राहणं आणि परदेशी नेत्यांनी त्यांना वैधता देणे. ट्रम्प यांनी पहिले दिले, मोदींनी दुसरे. भारताचे पंतप्रधान एखाद्या सहकाऱ्याची व्यक्तिगत गरज भागवण्यासाठी जगाच्या सर्वात संवेदनशील भागात, सर्वात चुकीच्या वेळी गेले. भारताच्या परराष्ट्र धोरणाची खरी समस्या ही आहे की, ते राष्ट्रहितांना या किंवा त्या जागतिक नेत्याशी असलेल्या वैयक्तिक संबंधांशी जोडतं.

इराणबाबत सतत चुकीची विदेश नीती इराणचे सर्वेसर्वा खामेनी यांची हत्या झाली त्यानंतर पाच दिवसांचे लाजिरवाणं मौन बाळगणारा देश भारत होता. एका देशाचा राष्ट्रप्रमुख मग तो आवडो किंवा न आवडो; मारला गेला. हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन होते. जगभरातील अनेक देशांनी निषेध नोंदवला. भारताने काय केले?

पाच दिवसांनंतर परराष्ट्र सचिव विक्रम मिश्री यांनी दिल्लीत इराण दूतावासात शोकनोंद पुस्तकावर सही केली. इस्रायलला दुखवायचे नाही म्हणून एका देशाच्या राष्ट्रप्रमुखाच्या हत्येवर पाच दिवस गप्प बसणे हा भेकडपणाच आहे. हा नैतिक कायरपणाच आहे. इराणसाठी हा संदेश स्पष्ट होता, भारत आमचा मित्र नाही, तटस्थ नाही. तो दुसऱ्या बाजूचा आहे. मग भारताला मध्यस्थ म्हणून कोण स्वीकारेल?

जयशंकरची विदेश नीती प्रत्यक्षात शून्य एस. जयशंकर हे भारताचे परराष्ट्र मंत्री म्हणून अत्यंत बोलघेवडे आहेत. २५ मार्चच्या सर्वपक्षीय बैठकीत जयशंकर म्हणाले, 'हम उनकी तरह दलाली नहीं कर सकते'. आपण पाकिस्तानसारखी दलाली करू शकत नाही. हे एक वाक्य जयशंकरांच्या संपूर्ण कारकीर्दीवर पाणी फेरणारा क्षण होता.

नॉर्वेने ओस्लो करार घडवला ते 'दलाल' होते का? कतारने अमेरिका-तालिबान बोलणी घडवली ते 'दलाल' होते का? स्वित्झर्लंडची संपूर्ण राष्ट्रीय ओळखच मध्यस्थीवर उभी आहे ते 'दलाल' आहेत का? जयशंकरांनी केवळ पाकिस्तानचीच नाही, तर तटस्थ मुत्सद्देगिरीच्या जागतिक तत्त्वाचीच थट्टा केली. जेव्हा भारताने रशिया-युक्रेन युद्धात मध्यस्थीची ऑफर दिली होती, तेव्हा भारत कोण होता? तेव्हा ती मध्यस्थी 'दलाली' होती असे जयशंकरांना म्हणायचे का? जयशंकरांचे 'दलाल' विधान हे गंभीर परराष्ट्र धोरणाचे प्रतिबिंब नसून सोशल मीडिया आणि देशांतर्गत प्रेक्षकांसाठी केलेले 'गल्लाभरू विधान' होते.

व्हाइट हाऊसच्या तीन भेटी, ट्रम्पसोबत जेवण आणि पाकिस्तान जगाच्या दृष्टीने अचानक महत्त्वाचे राष्ट्र झाले. इस्लामाबादमध्ये उच्चस्तरीय मुत्सद्दी चर्चा आयोजित केली गेली. सौदी अरेबिया, तुर्किये आणि इजिप्तचे परराष्ट्र मंत्री इस्लामाबादला आले. फायनान्शियल टाइम्सने लिहिले की पाकिस्तानच्या लष्करी नेतृत्वाने ट्रम्पशी थेट संपर्क केला. सीएनएनने सांगितलं की अमेरिकेचे प्रस्ताव पाकिस्तानच्या माध्यमातून इराणपर्यंत पोहोचवले जात होते.

पाकिस्तानने इराणवर झालेल्या इस्रायली हल्ल्यांची निंदा केली, अयातुल्ला खामेनी यांच्या हत्येचा निषेध केला आणि त्याचवेळी अमेरिकन लष्करी तळांवर इराणी हल्ल्यांचाही निषेध केला. दोन्ही बाजूंशी संपर्क ठेवण्याचे हेच तर कौशल्य आहे. हीच तर मुत्सद्देगिरी असते!

चाबहार बंदर कागदावरचे स्वप्न भारताने इराणशी चाबहार बंदराचा करार केला. अफगाणिस्तान आणि मध्य आशियापर्यंत पोहोचण्याचा 'गेमचेंजर' मार्ग म्हणून याचं भरपूर कौतुक झालं. 'पाकिस्तानला बायपास करतो' असं सांगण्यात आलं. पण इराण युद्धात ओढले गेले तेव्हा काय झालं? भारत मध्यस्थीच्या उच्च टेबलावरून वगळला गेला आणि त्यामुळे चाबहार बंदर हा शून्य भू-राजकीय वजन असलेला अर्धवट व्यावसायिक प्रकल्प म्हणून उघडा पडला.

पाकिस्तान मध्यस्थी करत असल्याने त्याला इराण प्रस्थापनेची सद्भावना मिळणार जी भारताने मोदींच्या इस्रायलधार्जिण्या मुत्सद्देगिरीने गमावली. म्हणजे भारताने इराणशी करार केला, पैसे ओतले, प्रकल्प उभारला, पण संबंध टिकवण्यात अपयशी झाला. यापेक्षा मोठी धोरणात्मक चूक काय असेल?

आखाती देशांमध्ये ८० लाखांहून जास्त भारतीय कामगार आहेत. त्यांचे रेमिटन्स वार्षिक १३५ अब्ज डॉलरपेक्षा जास्त आहेत. भारत आपल्या ऊर्जेच्या बहुतांश आयातीसाठी आखाती देशांवर अवलंबून आहे. जीसीसी सोबतचा व्यापार १८० अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. आखाती देशांची गुंतवणूक भारताच्या पायाभूत सुविधांसाठी अत्यावश्यक आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

## आसामसह केरळ आणि पुदुचेरीमध्ये मतदानाची रणधुमाळी

# २९६ जागांसाठी १,९९५ उमेदवारांच आज भवितव्य ठरणार : दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)




**आसाम** – देशातील तीन महत्त्वाच्या राज्यांमध्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात आज विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे. पुदुचेरी, केरळ आणि आसाममध्ये सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली.

कडक सुरक्षा व्यवस्थेत लाखो मतदारांच्या स्वागतासाठी निवडणूक आयोगाने तयारी पूर्ण केली आहे. आज आसाम, केरळ आणि पुदुचेरी या केंद्रशासित प्रदेशात विधानसभा निवडणुकीसाठी एकाच टप्प्यात मतदान होत आहे. सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली असून ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान सुरू राहील. निवडणूक आयोगाने तिन्ही ठिकाणी सर्व तयारी पूर्ण केली असून निष्पक्ष आणि शांततापूर्ण मतदान सुनिश्चित करण्यासाठी व्यापक व्यवस्था केल्याचा दावा केला आहे. कर्नाटक, नागालँड आणि त्रिपुरातील एका जागेसाठी पोटनिवडणूक विधानसभा निवडणुकी व्यतिरिक्त, आज कर्नाटकातील दोन, नागालँडमधील एक आणि त्रिपुरातील एका जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे.

गोव्यातील एका जागेसाठी पोटनिवडणूकही नियोजित होती, परंतु उच्च न्यायालयाने तेथील पोटनिवडणुकीला स्थगिती दिली आहे. निवडणूक अधिकाऱ्याने सांगितले की, आसाममध्ये १२६ जागांवरील ७२२ उमेदवारांचे भवितव्य ठरवण्यासाठी ३१,९४० मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. आसामच्या ३५ जिल्ह्यांमध्ये शांततापूर्ण मतदान सुनिश्चित करण्यासाठी निवडणूक आयोगाने दीड लाखांहून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात केले आहेत. संवेदनशील मतदान केंद्रांवर देखरेख ठेवण्यासाठी विशेषतः सूक्ष्म-निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. येथील मुख्य लढत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यात असून, लाखो मतदार आपल्या भावी प्रतिनिधींना निवडण्यासाठी मतदान केंद्रांवर दाखल झाले आहेत.

केरळमधील सर्व १४० जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान, ८८३ उमेदवार रिंगणात त्याचप्रमाणे, केरळमधील सर्व १४० जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान होत असून, तेथे ८८३ उमेदवार रिंगणात आहेत. राज्यातील २.७१ कोटी मतदार आज आपले मत देतील, ज्यात एलडीएफ तिसऱ्यांदा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहे, यूडीएफ आपली गमावलेली जागा पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे आणि एनडीए राज्यात आपले खाते उघडण्याची आशा बाळगून आहे. दरम्यान, पुदुचेरीमधील ९.५० लाख मतदारही २९४ उमेदवारांचे भवितव्य ठरवण्यासाठी ईव्हीएमवर मतदान करतील.

पंतप्रधान मोदींचे आसामच्या जनतेला आवाहन पंतप्रधान मोदींनी आपल्या ट्विटरवर पोस्ट करत आवाहन केलं कि, 'आसाम विधानसभा निवडणूक २०२६ साठी मतदानाला सुरुवात होत असताना, मी आसामच्या जनतेला मोठ्या संख्येने आपला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करतो. मला आशा आहे की राज्यातील तरुण आणि महिला मतदार उत्साहाने सहभागी होतील आणि ही निवडणूक लोकशाही व सार्वजनिक कर्तव्याचा उत्सव बनवतील.'

# जिल्हाधिकाऱ्यांचे हस्ते निलेश कोहळे सन्मानित

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## जिल्हास्तरीय पुरुष सन्मान सुधारक पुरस्कार प्रदान



**वरुड** – सामाजिक कार्य करत असताना अनेक लोकहिताचे आंदोलने, गोरगरिबांची कामे,शेतकरी,वंचित, शोषित, पीडित, महिला-पुरुष आणि विद्यार्थ्यांसाठी सुरळी येथील महात्मा गांधी तंटामुक्त समिती अध्यक्ष निलेश कोहळे यांच्याकडून बरेच अशी कामे करण्यात आली.

त्यामुळे निलेश कोहळे यांना जिल्हास्तरीय पुरुष सन्मान सुधारक पुरस्कार अमरावती येथील जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. 'माविम' कडून तालुकास्तरावरुन जिल्हास्तरीय निवड करण्यात आली 'जिल्हास्तरीय पुरुष सन्मान सुधारक' सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र वरुड अंतर्गत महिला सक्षमीकरणाकरीता संवेदनशील व गावपातळीवर महिलांच्या विकासाकरिता पुढाकार घेऊन उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल निलेश नरेंद्रराव कोहळे यांना 'जिल्हास्तरीय पुरुष सन्मान सुधारक' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा सत्कार जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती या ठिकाणी घेण्यात आला. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अमरावती. या पुरस्काराबद्दल सर्वत्र अभिनंदन केले जाता आहे.

# 'श्रीराम जय राम जय जय राम'ने वाठोडा परिसर दुमदुमला

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## जन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन



**चांदस वाठोडा** – येथे हनुमान मंदिर नवीन वस्ती येथे उत्सव समिती मार्फत हनुमान जन्मोत्सव निमित्त वाठोडा येथे भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले होते. 'श्रीराम जय राम जय जय राम'ने वाठोडा परिसर दुमदुमून गेला होता.

वाठोडा पुनर्वसन येथे हनुमान जन्मोत्सव निमित्त गेल्या ३ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भजन किर्तन, सुंदर कांड, श्रीराम जय राम जय जय राम ने परिसर दुमदुमला होता. या परिसरात ३ दिवस सतत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी देणगी रोख रक्कम व वस्तु स्वरुपात देण्यात आली व या प्रसंगी चांदस वाठोडा परिसरातील हजारो भाविकांनी महाप्रसाद घेतला असावा असा अंदाज व्यक्त केल्या जात आहे. कार्यक्रमासाठी विविध दानदात्यानी मोठ्या प्रमाणात दान देण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी गावातील युवकांनी खुप मेहनत घेतली. कार्यक्रमाचे यशस्वितेकरीता राजेश लोखंडे, कृणाल बोकडे, संजय दवंडे, विशाल बोकडे, किशोर दवंडे, तुषार लोखंडे, सुनिल बोकडे, रुपेश देशमुख, संजय देशमुख, आशिष खाडे, सुरज देशमुख, चंदु बोकडे, मनोज सालोडे, शैलेश उपासे, गणेश तडोकर, संतोष भोंडेकर, राहुल गावंडे, रुपेश पवार, रामदास सोनारे, पुरुषोत्तम बोकडे, अलकेश भुजाडे, राजु गलफट, चरणदास मोरले, ग्रामपंचायत सदस्य राहुल लोखंडे व सतवंतसिंग अंध्रले सह ग्रामवासीयांनी अथक परिश्रम घेतले.

# समाज कल्याण विभागामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाला सुरवात

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी आणि जनजागृती व्हावी, या उद्देशाने प्रत्येक जिल्ह्यात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

या सप्ताहाला ८ एप्रिलपासून सुरवात झाली असून हा सप्ताह १४ एप्रिल २०२६, पर्यंत चालणार आहे. सप्ताहा दरम्यान विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन, वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा, पथनाट्ये, कार्यशाळा, मेळावे आणि व्याख्यानांचा यात समावेश आहे. शासकीय योजनांची माहिती जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहोचवणे आणि सामाजिक समता, न्याय व बंधुता या मूल्यांना प्रोत्साहन देणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे. सप्ताह दरम्यान, जिल्हाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

९ एप्रिल रोजी शाळा, महाविद्यालये आणि शासकीय वसतिगृहांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित वक्तृत्व, निबंध आणि लघुनाटिका स्पर्धा आयोजित केल्या जातील. तसेच संत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त संत गाडगे महाराज यांच्या कार्याचे महत्व प्रतिपादन करणारे व्याख्यानं, वक्तृत्व स्पर्धा इत्यादिचे आयोजन करणे, याच दिवशी, जिल्हा आणि विभागीय स्तरावर शासकीय योजनांच्या लाभांचे प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना वितरण करण्यात येणार आहे.

१० एप्रिल रोजी समतादूतांद्वारे ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये पथनाट्ये आणि लघुनाटिकांच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या योजनांविषयी प्रबोधन केले जाईल. ११ एप्रिल रोजी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात येणार असून त्यांच्या सामाजिक कार्यावर व्याख्यान आयोजित केले जाईल. जेष्ठ नागरिकांचे मेळावे, शाळा वसतीगृह व महाविद्यालयांमध्ये आरोग्य तासणी व रक्तदान शिबीरांचे आयोजन करणे.

# तातडीने पंचनामे करुन नुकसान भरपाई द्या

## शेतकऱ्यांच्या वतीने तहसिलदार यांना निवेदन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – सावंगी, आमनेर परिसरात गेल्या ३ एप्रिल रोजी अचानक वादळी पाऊस आणि भीषण गारपिटीने संपुर्ण परिसराला झोडपुन काढले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून संत्रा, मोसंबी, गहु या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. असून नुकसानग्रस्तांना तातडीने भरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने तहसिलदार यांचकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, अचानक आलेल्या सोसाट्याचा वारा आणि मोठ्या आकाराच्या गारपिटीमुळे शेतातील उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले. यामध्ये प्रामुख्याने संत्रा आणि मोसंबीच्या बागांना गारपिटीचा मोठा फटका बसला असुन फळे गळून पडली आहेत. काढणीला आलेला गहु पुर्णपणे आडवे झाले आहे. केवळ शेतीच नव्हे तर गावातील अनेक घरांवरील कवेलु, टीन आणि ताडपत्री वादळामुळे उडुन गेल्याने ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

या परिस्थितीनंतर सुरेंद्र ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील शेतकरी आणि पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला निवेदन सादर केले आहे. या निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे की, महसूल विभागाने तातडीने या भागाची 'स्पॉट पाहणी' (मौका पाहणी) करुन पंचनामे पुर्ण करावेत. आर्थिक संकटात सापडलेल्या कास्तकारांना आणि ज्यांच्या घरांचे नुकसान झाले आहे अशा गावकऱ्यांना तातडीने शासकीय मदत जाहीर करावी, जेणेकरुन ते पुन्हा उभे राहू शकतील. 'निसर्गाच्या या प्रकोपामुळे शेतकरी पुर्णपणे पेचात पडला आहे. संत्रा आणि गव्हाचे झालेले नुकसान भरुन न निघणारे आहे.

शासनाने विलंब न लावता मदत करावी, अशी मागणी सुरेंद्र ठाकरे, गब्बर पठाण, राजु मानकर, अरविंद हिवसे, राजेश आहाके, झाकीर नवाब, शंकर गावंडे, गुणवंत वघाळे, जनार्दन बोरीवाल, कृष्णा उमप, राजकुमार कुथे, देवदास गाठे, दादाराव वानखेडे, प्रभाकर राऊत, हरिभाऊ ठाकरे, माधव हिवसे, मनोज नाडेकर, शोभा गोहत्रे आदींनी केली आहे.

# ठराव घेऊन सुद्धा विरोधी पक्षाकरीता कक्ष नाही

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## नगरसेवकांनी न.प.कार्यालयातच स्वखर्चाने थाटले कार्यालय



**वरुड** – ठराव घेऊन सुद्धा विरोधी पक्षाकरीता कक्ष उपलब्ध करुन न दिल्यामुळे विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी नगरसेवकांनी न.प.कार्यालयातच स्वखर्चाने कार्यालय थाटल्याचा नाविण्यपुर्ण घटना येथुन जवळच असलेल्या शेंदुरजनाघाट नगरपरिषदेमध्ये घडली.

नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शेंदुरजनाघाट शहरातील नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अ.प) गटाला भरभरुन मतदान केले. २० पैकी ६ उमेदवाराना विजयी करत सक्षम विरोधी पक्ष म्हणुन नगरपरिषद सभागृहात काम करण्याची संधी दिली. परंतु सत्ताधारी व प्रशासनाच्या हेकेखोर धोरणामुळे प्रबळ विरोधी पक्षाला काम करतांना स्वतंत्र कक्षाची गरज असतांना कक्ष नाकारण्यात आला. या करीता नपाच्या सर्वसाधारण सभेत रितसर ठराव घेण्यात आला होता. या ठरावात २८ मार्च अखेर मुदत देण्यात आली होती. मुदतीचा कालावधी समाप्त होऊन सुद्धा स्थानिक प्रशासनाने विरोधी पक्षाकरीता स्वतंत्र कक्ष उपलब्ध करुन दिला नसल्याने प्रशासनाला व सत्ताधाऱ्याना या बाबत वारंवार पत्राद्वारे सुचना निर्गमित करण्यात आल्या परंतु तरी सुद्धा आजपावेतो त्यांनी या बाबत कुठलीच भुमिका स्पष्ट केली नाही. अखेर राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी न.प.कार्यालयातील आवारात राष्ट्रवादी काँग्रेस गटनेता (विरोधी पक्ष) कार्यालयाचे स्वखर्चाने थाटामाटात उदघाटन केले व प्रत्यक्ष जनतेच्या कामाकाजास सरुवात केली.

यावेळी गटनेते तथा विरोधी पक्षनेते संदीप खडसे, स्विकृत सदस्य विशाल सावरकर, नगरसेवक राकेश दवंडे, बबलु छोटु, नगरसेविका सुनिता उईके, जाकिया बानो मोहम्मद कुरेशी, नामदेव कळंबे, मोहम्मद कुरेशी, लुकेश वंजारी, संजय वंजारी, अनिल आंडे, नेपाल पाटील, राजा मगरदे, आकाश वघाळे, अजय सरोदे, राष्ट्रवादी अल्पसंख्याक शहर उपाध्यक्ष आसिफ, सतीश काळे, नाना नवरंग, जगदीश लोखंडे, आकाश उईके, कपिल तरार, अकील मकसुद अली, शेख पिंटु, अब्दुल राजिक यांच्यासह आदी राष्ट्रवादी काँग्रेससह महाविकास आघाडी तसेच शहरातील गणमान्य नागरिक उपस्थित होते.

# कोकणातील कातळशिल्पांवर बनणार आंतरराष्ट्रीय माहितीपट : सरकारकडून १४.५० कोटींच्या निधीला मान्यता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – कोकणातील रत्नागिरी विभागातील कातळशिल्पांवर आंतरराष्ट्रीय दर्जाचा माहितीपट तयार करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सुमारे १४.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशीष शेलार यांनी दिली. रत्नागिरी परिसरातील सुमारे ३०० किमी लांबीच्या किनारपट्टीपैकी २५ किमी क्षेत्रात २००० हून अधिक कातळशिल्पे आढळून आली आहेत.

या निर्णयामुळे कोकणातील कातळशिल्पांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळण्यास मदत होईल तसेच पर्यटनवाढीला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अशी होणार निर्मिती माहितीपट निर्मितीसाठी दिग्दर्शक व सहाय्यक दिग्दर्शकांची नियुक्ती, सर्वेक्षण, अत्याधुनिक उपकरणे, वाहतूक व निवास व्यवस्था, तसेच स्टुडिओमधील एडिटिंग, साऊंड आणि व्हिज्युअल इफेक्ट्स आदी कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय ड्रोन फुटेज, सिनेमॅटिक शॉट्स, उच्च-गुणवत्तेचे छायाचित्रण आणि 'बिहाइंड द सीन' सामग्री तयार करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

# हिवताप विभागाच्या प्रलंबित मागण्यांबाबत खातेप्रमुखांशी सकारात्मक चर्चा : कर्मचारी संघटना आक्रमक

**सहसंचालक डॉ.संदीप सांगळे यांच्या दालनात पार पडली महत्त्वपूर्ण बैठक : बदल्या, पदोन्नती आणि वेतन त्रुटींबाबत दिला आश्वासनाचा शब्द**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मुलन कर्मचारी मध्यवर्ती संघटना (र.नं.२९३४) च्या शिष्टमंडळाने नुकतीच आरोग्य सेवा (हि.ह.व जरो) पुणे विभागाचे सहसंचालक तथा खातेप्रमुख मा.डॉ.संदीप सांगळे यांची भेट घेतली. पुणे येथील त्यांच्या दालनात पार पडलेल्या या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या सर्व मागण्यांवर डॉ.सांगळे यांनी सकारात्मक भूमिका दर्शवत प्रशासकीय पातळीवरील प्रश्न तातडीने सोडवण्याचे आश्वासन दिले आहे.

बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे आणि मागण्या: शासन परिपत्रक आणि पदोन्नतीचा पेच: १६ फेब्रुवारी २०२४ चे शासन परिपत्रक रद्द करण्याबाबत संघटनेने आग्रही भूमिका मांडली. या निर्णयामुळे हिवताप योजनेतील सेवा ज्येष्ठ कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या रखडल्या असून त्यांच्यावर अन्याय होत असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. यावर सविस्तर प्रस्ताव शासनास सादर केला असून लवकरच सकारात्मक निर्णय होईल, अशी शक्यता डॉ.सांगळे यांनी वर्तवली.

नवीन आकृतीबंध व सेवा नियम: हिवताप विभागाचा सुधारित आकृतीबंध आणि नवीन सेवा प्रवेश नियमांचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

बदल्या आणि पदनाम बदल: सन २०२६ च्या सार्वत्रिक बदल्या पारदर्शक पद्धतीने समुपदेशनानेच करण्यात याव्यात, अशी मागणी मान्य करण्यात आली. तसेच आरोग्य कर्मचारी यांचे पदनाम 'ग्राम आरोग्य अधिकारी' आणि आरोग्य पर्यवेक्षक यांचे पदनाम 'विस्तार अधिकारी (हिवताप)' करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याची विनंती संघटनेने केली.

आर्थिक लाभ आणि वेतन त्रुटी: बक्षी समितीने मंजूर केल्याप्रमाणे सातव्या वेतन आयोगाचे एस-८ वरून एस-९ मधे वेतन निश्चितीचे लाभ अनेक जिल्ह्यात प्रलंबित आहेत, ते त्वरित देण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली. तसेच १०, २०, ३० वर्षांच्या आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्याबाबतही चर्चा झाली.

जुनी पेन्शन आणि भत्ते: १ नोव्हेंबर २००५ पूर्वी कार्यरत असलेल्या हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी आणि फिरती करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कायम प्रवास भत्यात वाढ करावी, यावर सविस्तर चर्चा झाली.

प्रमुख मागण्यांचा सारांश: क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरीची सक्ती करू नये. हिवताप योजनेतील कर्मचाऱ्यांची आस्थापना 'जैसे थे' ठेवावी. रिक्त पदे भरण्यासाठी पदोन्नती कोटा १०% वरून २५% करण्यात यावा.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे मॅडम, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२६१/२०२६** **ने.ता.०४/०५/२०२६**

**अर्जदार :-** १) मोतिराम गजानन राऊत, वय अं.६४ वर्ष, धंदा-शेती, रा.एकदरा, ता.वरुड, २) उषा सुरेश ढोबळे, वय अं.५९ वर्ष, धंदा- घरकाम, रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती, ३) मिना हरिभाऊ नेवल, वय अं.५६ वर्ष, धंदा-घरकाम, रा.नारसिंगी, पो.भारसिंगी, ता.नरखेड, ४) अर्चना सुनिल चौधरी, वय अं.५० वर्ष, धंदा- घरकाम, रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती, ५) कल्पना गोवर्धन सातपुते, वय अं.४७ वर्ष, धंदा- घरकाम, रा.उदापुर, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत गजानन गोविंद उर्फ गोविंदराव राऊत व मयत सुभद्राबाई गजानन राऊत, रा.एकदरा. ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिसाचे आत किंवा **दि.०४/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **३०/०३/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२६०/२०२६** **ने.ता.२७/०४/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती रंजना सुनिल बनाईत, वय अं.३७ वर्ष, धंदा-घरकाम, २) कु.सोनिया सुनिलराव बनाईत, वय अं.१२ वर्ष, धंदा- शिक्षण, (अर्जदार क्र.१ ही स्वत:करीता व अ.पा.क आई म्हणून अर्जदार क्र.२ करीता) दोन्ही रा.बेनोडा (शहीद)

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुनिल बापुराव बनाईत, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिसाचे आत किंवा **दि.२७/०४/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०३/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**


# मालिका आणि चित्रपट यांची तुलना नको : मोती सागर यांचे मत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई :-** नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' चित्रपटातील प्रभू श्रीरामाच्या रूपातील रणबीर कपूरच्या पहिल्या लूकला रामानंद सागर यांचे पुत्र मोती सागर यांनी पसंती दर्शवली आहे. १९८७ ची रामायण ही प्रसिद्ध टीव्ही मालिका आणि आगामी चित्रपट यांची तुलना करणे त्यांनी चुकीचे ठरवले आहे. या दोन्ही माध्यमांचे स्वरूप पूर्णपणे वेगळे आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.



हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर गेल्या आठवड्यात या चित्रपटाचा पहिला टीझर प्रदर्शित झाला, ज्यातून प्रेक्षकांना या भव्य चित्रपटाच्या जगाची आणि रणबीर कपूरच्या 'राम' रूपाची झलक पाहायला मिळाली.

मोती सागर 'पीटीआय'शी बोलताना म्हणाले की, 'लोक अनेकदा विसरतात की आमची मालिका ७८ भागांची होती आणि प्रत्येक भाग ३०-४० मिनिटांचा होता. याउलट, चित्रपट केवळ तीन ते चार तासांचा असेल. त्यामुळे खूप फरक असणारच,' असे त्यांनी स्पष्ट केले. 'रामायण'चा पहिला भाग दिवाळी २०२६ मध्ये आणि दुसरा भाग दिवाळी २०२७ मध्ये प्रदर्शित होणार आहे. त्याकाळी प्रत्येक भागासाठी ९ लाख रुपये खर्च येत असे. रामायण तेव्हा आणि आता त्याकाळी ग्राफिक्स उपलब्ध नसल्यामुळे विशेष दृश्ये तयार करण्यासाठी त्यांनी अनेक 'जुगाड' केले होते. उदाहरणार्थ, धुके निर्माण करण्यासाठी अगरबत्ती आणि धूपाचा वापर केला जाई. तर धनुष्यबाणांच्या दृश्यांसाठी विशेष यंत्र वापरले होते. आता तंत्रात खूपच फरक पडला आहे.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३०८/२०२६** **ने.ता.०७/०५/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती प्रमिला कृष्णराव कडु, वय अं.६३ वर्ष, धंदा-घरकाम, २) राजेश कृष्णराव कडु, वय अं.४० वर्ष, धंदा-शेती, ३) हरिश कृष्णराव कडु, वय अं.३८ वर्ष, धंदा- शेती, ४) शारदा गोपाळराव भुंबर, वय अं.४५ वर्ष, धंदा- घरकाम, क्र.१ ते ४ रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ५) वर्षा संजय पांडे, वय अं.३५ वर्ष, धंदा- घरकाम, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत कृष्णराव कडु, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिसाचे आत किंवा **दि.०७/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०६/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३०७/२०२६** **ने.ता.११/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती कौसल्या बापुराव उर्फ बाबुरावजी कोडापे, वय अं.७४ वर्ष, धंदा-घरकाम, २) रविंद्र बापुरावजी उर्फ बाबुरावजी कोडापे, वय अं.४६ वर्ष, धंदा- मजुरी, ३) राजेंद्र बापुराव उर्फ बाबुरावजी कोडापे, वय अं.४९ वर्ष, धंदा-मजुरी, क्र.१ते ३ रा.गव्हाणकुंड, ४) सौ.रेखा जगदीश गजामे, वय अं.५६ वर्ष, धंदा- घरकाम, रा.प्रभात पट्टण, ता.प्रभात पट्टण

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **बापुराव उर्फ बाबुरावजी रामसु कोडापे, मु.गव्हाणकुंड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०६/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३०४/२०२६** **ने.ता.११/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती चंद्रकला रामचंद्र घरत, वय अं.६६ वर्ष, धंदा-गृहिणी, २) रंजीत रामचंद्र घरत, वय अं.३६ वर्ष, धंदा-शेती, ३) संदिप रामचंद्र घरत, वय अं.३५ वर्ष, धंदा- शेती, ४) सौ.दुर्गा राजकुमार बागडे, वय अं.४२ वर्ष, धंदा- गृहिणी, क्र.१ ते ४ रा.गणेशपुर (जामठी), ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत झिबाजी बाबुराव घरत, मु.गणेशपुर ( जामठी ), ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०७/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२९६/२०२६** **ने.ता.०७/०५/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती नर्मदा कैलाश चिंचमलातपुरे, वय अं.७० वर्ष, धंदा-गृहीणी, रा.बेनोडा, ता.वरुड, २) सौ.वैशाली सुनिलराव विंचुरकर, वय अं.४५ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.जरुड, ३) सौ.अर्चना सुनिल सोनी (दारोडकर), वय अं.४३ वर्ष, धंदा- गृहीणी, ४) सौ.प्रणाली तेजन सागळे, वय अं.३२ वर्ष, धंदा- मजुरी, ५) दिलीप भाऊराव राजुरकर, वय अं.३८ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.पातुर, ता.पातुर, जि.अकोला

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत कैलाश मोतीराम चिंचमलातपुरे, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिसाचे आत किंवा **दि.०७/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०८/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

वॉटरपार्कमध्ये भीषण अपघात, मॅनेजमेंटची एक चूक अंगलट

# वॉटर स्लाईडवरुन घसरून महिलेच्या मणक्याचे ४ तुकडे, मालकसह व्यवस्थापकावर गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**मुंबई** - उन्हाची चाहूल लागताच अनेकजण वॉटरपार्ककडे आकर्षित होत असतात.

मात्र या वॉटरपार्कमध्ये सुरक्षेच्या दृष्टीनं योग्य त्या उपाययोजनांचा अभाव नसल्यास हेच पर्यटनस्थळ मोठ्या अपघाताचं कारण ठरू शकते. असाच काहीसा प्रकार पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात असलेल्या 'मोराची चिंचोली' गावातील जय मल्हार कृषी पर्यटन केंद्रामध्ये घडला आहे.

यात सहलीसाठी आलेल्या एका ३७ वर्षीय महिलेचा वॉटर स्लाइडवरून घसरताना पाण्याची पातळी कमी असल्याने झालेल्या अपघातात पाठीच्या मणक्याचे चार तुकडे झाले असून महिलेचे अर्धे शरीर निकामी झाले आहे.

या अपघाता प्रकरणी पर्यटन केंद्राचा मालक व व्यवस्थापकावर शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातात पाठीच्या मणक्याचे चार तुकडे, अर्धे शरीर निकामी पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात असलेल्या 'मोराची चिंचोली' गावातील एका वॉटर पार्कमध्ये भीषण अपघाताची घटना घडलीय.


# चेंजिंग रूममध्ये सीसीटीव्ही कॅमेरा


(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पुणे** - पुण्याच्या कामशेत परिसरात असलेल्या एका दुकानामध्ये कपडे बदलण्यासाठी गेलेल्या महिलेचे सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या साहाय्याने चित्रीकरण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी कामशेत पोलिसांनी दुकान मालकावर गुन्हा दाखल करून त्यास अटक केली आहे. मुकेश मुथा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पीडितेस दमदाटीही केली मिळालेल्या माहितीनुसार, महिला मुकेश फॅन्सी कॉर्नर या दुकानात खरेदीसाठी गेली होती. यावेळी दुकान मालक मुकेश मुथा याने दुकानाच्या स्टोअर रूममध्ये सीसीटीव्ही कॅमेरा आहे, हे माहिती असतानाही पीडितेस तिथे कपडे बदलण्यासाठी पाठवले.

# राजुरा रस्त्यावर वाढलेल्या झाडाझुडपांचा धोका : अपघाताची मालीका सुरुच

## वाळलेल्या व झुकलेल्या झाडे व फाद्यांमुळे वाहनचालक त्रस्त, प्रशासनाच्या दुर्लक्षावर संताप









"वरुड-राजुरा बाजार रस्त्याची अवस्था अत्यंत धोकादायक झाली असून प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. रस्त्यालगत वाढलेली झाडाझुडपे व वाळलेली झाडे वेळेत हटवली असती तर अपघात टाळता आले असते. एकाला जीव गमवावा लागणे, ही अत्यंत गंभीर बाब असून याची जबाबदारी संबंधित विभागाने स्वीकारली पाहिजे, सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कारवाई करुन संपूर्ण मार्गावरील झाडांची छाटणी व वाळलेली झाडे हटवण्याचे काम युद्धपातळीवर करावे, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करणेही आवश्यक असल्याची प्रतिक्रिया जि.प.माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर दाभाडे यांनी व्यक्त केली.



"वरुड-राजुरा बाजार रस्त्यावर वाढलेल्या झाडाझुडपांमुळे आणि वाळलेल्या झाडांमुळे प्रवास करणे अत्यंत धोकादायक झाले आहे. दिवसेंदिवस अपघातांची संख्या वाढत असताना संबंधित प्रशासन मात्र दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. या रस्त्यावरुन दररोज व्यापारी व नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. अशा परिस्थितीत एकाला जीव गमवावा लागणे, ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. वेळेत झाडांची छाटणी केली असती तर ही घटना टाळता आली असती तसेच प्रशासनाने तातडीने कारवाई करुन रस्त्यालगतची झाडे छाटावीत व वाळलेली झाडे हटवावीत, अन्यथा नागरिक व व्यापाऱ्यांच्या सुरक्षेसाठी आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही व्यापारी दुर्वास पाटील यांनी दिला आहे.

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - वरुड ते राजुरा बाजार या प्रमुख मार्गावर वाढलेल्या झाडाझुडपांमुळे व वाळलेल्या झाडांमुळे अपघातांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून या धोकादायक परिस्थितीमुळे एका युवकाला आपला जीव गमवावा लागल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. यापुर्वी सुध्दा अशा प्रकारचे अनेक अपघात यामुळे झालेले आहेत परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसुन येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे लक्ष दिले नाही तर तिव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा आता या रस्त्याने ये-जा करणाऱ्यांनी दिला आहे.

या रस्त्यावर अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या रस्त्यावर झुकलेल्या अवस्थेत असून काही झाडे पूर्णपणे वाळलेली आहेत. त्यामुळे वाहनचालकांना रस्ता दिसणे कठीण होत असून अचानक समोर येणाऱ्या फांद्यांमुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी हा धोका अधिक गंभीर ठरत आहे. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या असूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यापुर्वी सुध्दा या रस्त्याने अनेक अपघात झालेले आहेत, अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत परंतु संबंधित प्रशासन लक्षच देत नसल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. सदर अपघातानंतरही संबंधित विभागाने तात्काळ झाडांची छाटणी व वाळ-लेली झाडे हटविण्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा भविष्यात आणखी मोठ्या दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## पुण्यातील 'त्या' पोलिसांवर कारवाईचा बडगा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***अमरावती*** - तरुण तरुणीला शारीरिक संबंधांच्या रॅकेटमध्ये अडकवतो, अशी धमकी देणाऱ्या तीन पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारत या पोलिसांचे अखेर निलंबन करण्यात आले आहे. पुण्यातील वाघोली पोलीस ठाण्यातील तीन पोलीस कर्मचाऱ्यांवर हि कारवाई करण्यात आली आहे.

शारीरिक संबंधांच्या रॅकेटमध्ये अडकवण्याची धमकी देऊन आयटी अभियंता तरुण-तरुणीकडून १० हजार रुपये उकळले होते. या प्रकरणी पोलीस हवालदार किरण अब्दागिरी, पोलीस शिपाई गणेश खाडे आणि किरण कांबळे अशी निलंबित कर्मचाऱ्यांचे नावे आहेत.

# तरुणीला ब्लॅकमेल करुन डॅम्पवर नेवुन केला अत्याचार

## वरुड पोलिस ठाण्यात नराधम आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – अल्पवयीन मुलीचा असहायतेचा फायदा घेऊन तिला ब्लॅकमेल करत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी अल्पवयीन पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीवरुन वरुड पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अल्पवयीन फिर्यादी तरुणी तिच्या घरासमोर उभी असतांना आरोपी कन्हैया उर्फ आबु गजानन कलाने (२०), रा.शहापूर याने तिला गाठले. 'तु मला आज संध्याकाळी ७ वाजता डॅम्पजवळ भेटायला ये,' असे त्याने बजावले. तरुणीने येण्यास नकार दिला असता आरोपी कन्हैया उर्फ आबु याने तिला धमकी दिली की, जर तु आली नाहीस तर तु कोणा कोणाशी बोलतेस आणि कोणाला भेटायला जातेस हे तुझ्या आई-वडिलांना सांगुन टाकेन. या धमकीला घाबरुन आणि बदनामीच्या भीतीने पीडित तरुणी संध्याकाळी ७ वाजता डॅम्प परिसरात पोहोचली.

तरुणी डॅम्पवर पोहोचल्यानंतर आरोपी कन्हैया उर्फ आबु याने तिला पकडुन तिच्यासोबत जबरदस्ती करण्यास सुरुवात केली. पीडितेने त्याला वारंवार विरोध केला आणि आपण मित्र म्हणुन राहतो, असे सांगुन त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र 'तु मला आवडतो,' असे म्हणत आरोपी कन्हैया उर्फ आबु याने तिच्या विरोधाला न जुमानता तिच्यावर अत्याचार केला. या घटनेबद्दल कोणाला काही सांगितले तर याद राखा, अशी धमकीही त्याने पीडितेला दिली.

या प्रकरणी अल्पवयीन पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी आरोपी कन्हैया उर्फ आबु गजानन कलाने (२०), रा.शहापूर याचेविरुध्द भादंवि ६४ (२) (प), ६५ (१), ३५१ (२) बिएनएस सहकलम ४ पोस्को २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

## वरुड-राजुरा बाजार मार्गावरील झालेल्या अपघातात

# राजुरा बाजार येथील १८ वर्षीय युवकाचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – तालुक्यातील वरुड, राजुरा मार्गांवर वादळी वाऱ्यामुळे रस्त्यावर पडलेल्या झाडावर दुचाकी आदळुन झालेल्या अपघातात ३ युवक गंभीर जखमी झाले होते. त्या जखमी पैकी एकाचा मृत्यू झाला असून दोघावर उपचार सुरु आहे.

ओम संजय गोहत्रे (१८) असे मृतकाचे नाव आहे. तालुक्यात गत दि.३ ला सायंकाळच्या सुमारास अवकाळी पाऊस झाला. यावेळी सोसत्याच्या वाऱ्यामुळे वरुड-राजुरा बाजार या रस्त्यावर मोठे कडुलिंबाचे झाड तुटून आडवे पडले होते. ढगाळ वातावरण व अंधार पडल्याने रस्त्यावर आडवे झालेले झाड दिसत नव्हते. सदर झाडामुळे रस्ता बंद झाला असल्याने सामाजिक कार्य करणाऱ्या निलेश साबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ते झाड तोडून रस्ता मोकळा करण्याचे काम सुरु केले होते. अशातच वरुड वरुन राजुरा बाजारकडे वेगात दुचाकी येतांना त्यांना दिसली त्यांनी दुचाकी थांबविण्याचा प्रयत्न केला मात्र तेवढ्यातच दुचाकी त्या झाडावर आदळली.

या अपघातात दुचाकी वरील रितेश अशोक बहुरुपी (१८), साहिल गुणवंत सुरजुसे (१८) व ओम संजय गोहत्रे (१८) सर्व रा.राजुरा बाजार हे तिघे जखमी झाले होते. त्यानंतर लगेच त्यांना उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले होते. उपचारादरम्यान ओम गोहत्रे याचा काल दि.७ ला रात्रीच्या दरम्यान मृत्यू झाला तर इतर दोघांवर उपचार सुरु आहे. ओमच्या मृत्यूमुळे राजुरा बाजार येथे शोककळा पसरली आहे.

